# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १७४/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | सौ. जान्हवी विजय लांडगे, (केस क्र.१७४ /२०११-१२)<br>२/४७, उमा सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित,<br>मुरारजी पेठ, सोलापूर | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, ऊर्जा नगर, सोलापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर विभागीय कार्यालय, सोलापूर | विरुध्द पक्षकार |
| ३) | उप कार्यकारी अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>शहर अ उप विभागीय कार्यालय, सोलापूर | |

कोरम : १) श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## संयुक्त न्याय निर्णय

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौ. जान्हवी विजय लांडगे यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी शहर विभाग, सोलापूर यांचेविरुध्द दि. १६.२.२०१२ रोजी तक्रार दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

तक्रारदार हे वितरण कंपनीचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. ३३०२४८५४१४७४ असा आहे. तक्रारदार हे उमा सहकारी गृह निर्माण संस्था मर्यादित, जुनी मील आवार, सोलापूर या संस्थेचे सभासद आहेत. त्यांना वि.प.ने व्यापारी दराने विद्युत पुरवठा दिला आहे. या सहकारी संस्थेतील ग्राहकांचा विद्युत पुरवठा घरगुती दराने करावा ही विनंती मंचाने मान्य केल्याचे कळविले आहे. तक्रारीमध्ये कायमस्वरुपी घरगुती कनेक्शन मिळावे अशी मागणी केली आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांनी आपल्या दि. ४.१०.२०११ च्या आदेशामध्ये तक्रारदार / अर्जदार यांचेकडून कायमस्वरुपी घरगुती वीज जोडणीचे वीज मागणी अर्ज प्राप्त झाल्यास नियमानुसार वीज जोडणी देण्याची कार्यवाही करण्यात यावी असे म्हटले आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १०.४.२०१२ च्या लेखी अहवालात ग्राहकांना त्यांचे मागणीनुसार टेंपररी कॅटेगरीप्रमाणे विद्युत जोडण्या देण्यात आलेल्या होत्या. कांही ग्राहकांनी टेंपररी ऐवजी कायमस्वरुपी घरगुती श्रेणीप्रमाणे बील आकारणी व्हावी म्हणून वैयक्तिकरित्या अ-१ फॉर्म भरुन कंपनीकडे रितसर मागणी केलेली होती. तथापी, त्यांना त्यांच्या मागणीनुसार कायमस्वरुपी घरगुती दराने वीज बील आकारणी न झाल्याने अंतर्गत कक्ष, सोलापूर व मंचाकडे तक्रार नोंदविलेली होती. अंतर्गत कक्ष व मंचाने ग्राहकांनी अ-१ फॉर्म भरुन मागणी केलेल्या दिनांकापासून कायमस्वरुपी घरगुती दराप्रमाणे आकारणी करण्याचे आदेश दिलेले आहेत. कार्यकारी अभियंता (शहर) सोलापूर यांनी उप कार्यकारी अभियंता, शहर अ उप विभाग, सोलापूर यांना तशा सूचना देण्यात आल्याचे म्हटले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मंचासमोर दि. ११.४.२०१२ रोजी सुनावणी घेतली असतां, अर्जदार ग्राहक उपस्थित. वि.प.चे अधिकारी उपस्थित. त्यांनी मंचासमोर ग्राहकास अ-१ फॉर्म देऊन तक्रारदाराचे गाऱ्हाणे दूर झाले आहे, दर संकेत बदलून (change of tariff) घरगुती दरानुसार आकारणी, ग्राहकाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर करण्यात येईल असे सांगितले. या पूर्वी मंचाने दि. ३०.४.२०११ रोजी सदर गृहनिर्माण संस्थेती कांही सभासदांच्या गाऱ्हाण्यावर आदेश देऊन वि.प.ने ग्राहकास अे-१ दाखल झालेल्या तारखेपासून घरगुती स्वरुपाची कायमस्वरुपी वीज जोडणी द्यावी असे आदेश दिले आहेत. प्रस्तुत प्रकरणी अंतर्गत कक्षाचे आदेश कायम करण्यात येत आहेत. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीचे अधिकाऱ्यांनी ग्राहकास अे-१ फॉर्म मंचासमोर दिला व अर्जाची पूर्तता केल्यानंतर घरगुती दराने कायमस्वरुपी वीज जोडणी देण्याचे मान्य केले. त्यामुळे ग्राहकाची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

३) वितरण कंपनी शहर विभाग, सोलापूर यांचेकडे तक्रारदाराने अे-१ फॉर्मची पूर्तता केल्यानंतर त्यांनी ग्राहकास घरगुती दराने कायमस्वरुपी वीज जोडणी द्यावी. त्याचा अहवाल मंचास त्वरित द्यावा.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com